**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**कर्मचारीवर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल ,मुंबई ४०० ००८**

# सरळसेवा भरती

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक (कनिष्ठ), वाहक (कनिष्ठ), लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदांकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (**Online**) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित केलेला नमुना अर्ज सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहीरात काळजीपूर्वक वाचावी.

१) **महामंडळाच्या सर्व विभागामध्ये चालक (कनिष्ठ) - ८९४८, वाहक (कनिष्ठ) -६२४७, सहाय्यक (कनिष्ठ)-२६५८, लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ)-१९३६ अशी एकूण १९७८९ पदे भरावयाची आहेत. अनुशेष,सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षण विचारात घेऊन विभाग व संवर्गनिहाय भरावयाच्या पदांची संख्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या www.msrtc.gov.in व महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील** महाराष्ट्र ज्ञान महामंडळ **मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org** या संकेतस्थळावर **देण्यात आली आहे.**

२) **उपरोक्त पदांसाठी विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव / शारिरीक पात्रता/ वयोमर्यादा इत्यादीचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

## पदाचे नांव :- चालक (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी** :-- रु.२७९०-३८७०/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ.(सदर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.)

२) **शैक्षणिक अर्हता :--**

अ) इयत्ता १० वी (एस.एस.सी.) उत्तीर्ण.

ब) मराठी भाषेमध्ये लिहिता वाचता येणे आवश्यक.

क) प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ.) यांचेकडील सार्वजनिक अवजड वाहन चालविण्याचा वैध परवाना व पी.एस.व्ही.बॅज (बिल्ला ) आवश्यक.

३) **अनुभव** :-- सर्व प्रकारची अवजड वाहने विशेषतः डिझेलवरील अवजड वाहन (ट्रक, प्रवासी बस ) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा विना अपघात अनुभव असणे आवश्यक आहे. अवजड वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्याच्या तारखेपासून पुढील ३ वर्षाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्या अगोदरच्या अनुभवाचा दाखला ग्राहय धरला जाणार नाही. अनुभवाचा दाखला ट्रक मालक व स्थानिक लोकप्रतिनिधी / राजपत्रित अधिकारी यांच्या स्वाक्षरीसह उपरोक्त संकेतस्थळावर दिलेल्या विहित नमुन्यात असणे आवश्यक आहे.सदर दाखला निवडपूर्व कागदपत्रांच्या तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

४) **शारिरीक पात्रता** :--अ) ऊंची किमान १६० सें.मी.व कमाल १८० से.मी.
ब) दृष्टी - चष्म्याविना ६ X ६ ( चष्म्याविरहीत दृष्टी ) असणे आवश्यक.
क) रंगआंधळेपणा किंवा रातांधळेपणा हा दोष असल्यास अपात्र

५) **वयोमर्यादा** :-- दिनांक ७.८.२०१२ रोजी उमेदवाराचे वय २४ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

## पदाचे नांव :- वाहक (कनिष्ठ)

१. **वेतनश्रेणी** :-- रु. २४४०-३३८४.अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते. प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ. (सदर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.)

२. **शैक्षणिक अर्हता** :--

अ) इयत्ता १० वी (एस.एस.सी.) उत्तीर्ण.

ब) मराठी भाषेमध्ये लिहिता व वाचता येणे आवश्यक.

क) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आर.टी.ओ.) प्राप्त केलेला वाहकाचा वैध परवाना व बिल्ला आवश्यक.

ड) जामीन देण्याचे सामर्थ्य (क्षमता )असणे आवश्यक आहे.

३. **शारिरीक पात्रता** :-- ऊंची किमान १५८ सें.मी. व कमाल १७८ सें.मी.असणे आवश्यक.
( महिलांसाठी किमान ऊंची १४८ सें.मी.)

४. **वयोमर्यादा** :-- दिनांक ७.८.२०१२ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

## पदाचे नांव :- सहाय्यक (कनिष्ठ)

१. **वेतनश्रेणी** :-- रु.२४४०-३३८४/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते. प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ. (सदर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.)

२. **शैक्षणिक अर्हता** :-- संबंधित व्यवसायातील शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) कोर्स उत्तीर्ण. सदर पदासाठी खालील व्यवसाय (ट्रेड) विहीत करण्यात आले आहेत. १) मोटार मेकॅनिक, २) शिट मेटल, ३) इलेक्ट्रीशियन / ऑटो इलेक्ट्रीशियन, ४) वायरमन ५) ब्लॅकस्मिथ, ६) टीनस्मिथ / वेल्डर, ७) पेंटर ८) यांत्रिकी उपकरण ९) डिझेल मेकॅनिक, १०) मशिनिस्ट, ११) टर्नर १२) कार्पेंटर (सुतार ). विभाग/कार्यशाळेसाठी आवश्यक असे व्यवसाय (ट्रेड) रा.प.महामंडळाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आले आहेत. सबब, त्या विभागासाठी आवश्यक अशा व्यवसायातील शासनमान्य आय.टी.आय.उत्तीर्ण असणा-या उमेदवारांनीच अर्ज करावेत. रा.प.महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर दर्शविल्यानुसार विभागाच्या / मध्यवर्ती कार्यशाळेच्या गरजेनुसार त्या त्या व्यवसायातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३. **वयोमर्यादा** :-- दिनांक ७.८.२०१२ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

## पदाचे नांव :- लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी** :-- रु.२८८०-३९९४/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते. प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ. (सदर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.)

२) **शैक्षणिक अर्हता** :--

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी.

ब) टंकलेखन : मराठी- ३० शब्द प्रति मिनिट व इंग्रजी- ४० शब्द प्रति मिनिट परीक्षा उत्तीर्ण असल्याचे शासनमान्य संस्थेने दिलेला दाखला.

क) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा 'O' स्तर किंवा 'A' स्तर ,'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ , मुंबई यांचेकडील अधिकृत "MSCIT" परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक.

३) **वयोमर्यादा** :-- दिनांक ७.८.२०१२ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.तसेच अपंग प्रवर्गातील / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

४) **सदर पदाकरीता काही विभागांतील अपंगांसाठी रिक्त असलेल्या जागांकरीता ''अंधत्व किंवा क्षीणदृष्टी'' व ''श्रवणशक्तीतील दोष '' या दोन अपंगत्वाच्या प्रकारात मोडणारे अपंग उमेदवार अर्ज करु शकतात.अपंगांची पदे दर्शविणारा विभागनिहाय तक्ता हा उपरोक्त नमूद केलेल्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.**

## ३) भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष : ---

| अ. क्र. | पद | वस्तुनिष्ठ लेखी परीक्षेसाठी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण | वाहन चालन चाचणी/ व्यवसाय चाचणी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण. | अंतिम निवडीसाठी निकष शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-१०११/प्र.क्र.-९९/११/१३-अ दिनांक २६.१२.२०११ वर आधारित. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | चालक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br><br>उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br><br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून त्या त्या जाती प्रवर्गातील लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार १:५ या प्रमाणात उमेदवारांना वाहन चालन चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. १०० गुणांची वाहन चालन चाचणी घेण्यात येईल.उत्तीर्णतेसाठी किमान ५० गुण आवश्यक | १)लेखी परीक्षेमधील गुणांवर ४० टक्के भारांक, वाहन चालन चाचणी मधील गुणांवर ६० टक्के भारांक या एकत्रित भारांकानुसार मुलाखत न घेता गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल. |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २ | वाहक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br><br>उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | व्यवसाय चाचणी नाही | मुलाखत न घेता लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. |
| ३ | सहाय्यक (कनिष्ठ ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br>उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | व्यवसाय चाचणी नाही | मुलाखत न घेता लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. |
| ४ | लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br>उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | व्यवसाय चाचणी नाही | मुलाखत न घेता लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. |

एकाच स्थानासाठी (Position ) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

अ) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर.

ब ) मागासवर्गीय उमेदवारांमध्ये प्रथम अनुसूचीत जमाती ,अनुसूचीत जाती ,विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग या क्रमाने त्यानंतर.

क) शारिरीकदृष्टया अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

ड) माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

इ) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार,

ई) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल )

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**४) <u>रा.प.महामंडळातील कार्यशाळा शिकाऊ उमेदवार</u> :--**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये संबंधित विभागात कार्यशाळा शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारांकरीता सहाय्यक (कनिष्ठ) या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पदांच्या संख्येच्या ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, त्यांची निवड लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

**५) <u>शासन सेवेतील अंशकालीन कर्मचारी :--</u>**

रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या, शासकिय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक अशंकालीन उमेदवारांना १० टक्के समांतर आरक्षण लागू राहील व उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

**६) <u>माजी सैनिक :--</u>**

संरक्षण दलात (Army / Navy / Airforce ) सेवा केलेल्या उमेदवारांना १५ टक्के आरक्षणाचा लाभ मिळेल. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. सदर सवलत नागरी सेवेतील प्रथम नेमणूकीकरीता अनुज्ञेय राहील. याबाबतचे प्रतिज्ञापत्र उमेदवारास अंतिम निवडपूर्व तपासणीच्या वेळी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहील.

**७) <u>खेळाडू :--</u>**

शासन निर्णय क्रमांक राक्रिधो.२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दि.३०.०४.२००५ मध्ये शासनाने अत्युच्य गुणवत्ताधारक खेळाडूंना विहित केलेल्या तरतूदीनुसार ५% समांतर आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. यासाठी उमेदवाराने सदर शासन निर्णयातील दिलेल्या नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेला दाखला अंतिम निवडपूर्व तपासणीवेळी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहील.

**८) <u>महिला :--</u>**

शासन निर्णय , महिला व बालकल्याण विभाग क्र.संकिर्ण १०९६/प्र.क्र.३०/का.२, दि.०१.०८.१९९७ आणि क्र.८२/२००१/मसआ.२०००/प्र.क्र.४१५/ का.२, दि.२५.०५.२००१ (सहपत्र १२ आणि १३) अन्वये निर्गमित केलेल्या सूचनांनुसार महिलांसाठी सर्व पदांकरीता ३०% पदे आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. महिलांच्या नावात बदल असल्यास निवडपूर्व तपासणीवेळी वेळी राजपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक राहील.

**९) <u>स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य,जनगणना कर्मचारी व निवडणूक कर्मचारी यांना वयोमर्यादेमध्ये शिथिलता</u> :--**

शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ. दिनांक ६ ऑक्टोबर,२०१० नुसार स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य,सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांना नियुक्ती मिळण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. तसेच, सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केलेली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील.

**१०) <u>रा.प.महामंडळातील कर्मचारी</u> :--**

विहित अर्हता व आवश्यकता पूर्ण करणा-या रा.प.महामंडळातील कोणत्याही कर्मचा-याला उपरोक्त पदांसाठी कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. परंतु, सदर कर्मचा-याने अर्ज करण्यापूर्वी संबंधीत विभाग प्रमुखांना सूचीत करणे आवश्यक राहील. संबंधित विभाग प्रमुखांचा ना हरकत दाखला उमेदवारास अंतिम निवडपूर्व तपासणीवेळी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहील.

## ११) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र :--

शासनाने सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित करणारे महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ) नियम -२००५ दिनांक २८ मार्च,२००५ च्या अधिसूचनेद्वारे पारीत केले आहे. सदर प्रतिज्ञापन उमेदवाराने निवडपूर्व तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## १२) मराठी भाषेचे ज्ञान :--

उमेदवारांना मराठी भाषेचे लिहिण्या वाचण्याचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

## १३) उच्चतम वेतनश्रेणी :--

निवड झालेल्या उमेदवारास वर दर्शविलेल्या वेतनश्रेणीत प्रथम ५ वर्षे कालावधीसाठी नेमणूक देण्यात येईल. सदर कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना खाली दर्शविलेल्या उच्चतम वेतनश्रेणीमध्ये महामंडळाचे नियम / अटीच्या अधीन सामावून घेण्यात येईल. नेमणूकीनंतर त्या त्या वेळी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.

**उच्चतम वेतनश्रेणी** :-

१) चालक : ४७००-१५३६७
२) वाहकः ४३५०-१४२२५
३) सहाय्यक : ४३५०-१४२२५
४) लिपीक-टंकलेखक : ४७९०-१५६६३

(सदर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे )

## १४) भरती प्रक्रिया शुल्क :--

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना रुपये ३००/- आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांना रुपये १५०/- एवढे भरती प्रक्रिया शुल्क जाहिरातीत नमूद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भरावे लागेल. उमेदवारास एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व त्यासाठी स्वतंत्र भरती प्रक्रिया शुल्क भरावे लागेल.

## १५) अर्ज स्विकृतीची अंतिम तारीख :--

उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने नोंदणी (रजिस्ट्रेशन) ची सुविधा दिनांक ०५.०९.२०१२ रोजी रात्री २३.३० वाजेपर्यंत संबंधीत संकेतस्थळावर उपलब्ध राहील. केवळ नोंदणी (रजिस्ट्रेशन) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही. नोंदणी केल्यावर उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये चलनाद्वारे कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसाच्या आत भरती प्रक्रिया शुल्क जमा करुन उर्वरित अर्ज पूर्णपणे भरणे आवश्यक आहे.

## १६) नियुक्ती प्राधिकारी :-

उपरोक्त जाहिरातीतील नमूद केलेली विभागनिहाय पदे भरण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी हे संबंधीत विभाग नियंत्रक आहेत. तथापि, सुसूत्रीकरणासाठी या सर्व विभागातील पदांची जाहिरात महाव्यवस्थापक (क.व औ.सं.),मध्यवर्ती कार्यालय,म.रा.मा.प.महामंडळ,मुंबई यांचेमार्फत देण्यात येत आहे.

## १७) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना .

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन)करण्याचा कालावधी | दि.७.८.२०१२ | ५.९.२०१२ |
| २. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | दि.७.८.२०१२ | ७.९.२०१२ |
| ३. | ज्या उमेदवारांनी बँकेमधे दिनांक ७.९.२०१२ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि.१०.९.२०१२ पर्यंत | |

## १८) अर्ज करण्याची पध्दत :

१. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित केलेला नमुना अर्ज सदर संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवार त्यांचा अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी एम.के.सी.एल.पुणे यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेऊ शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्रांची (ALC-Authorised Learning Centre) पत्त्यासह माहिती **http://msrtc.mkcl.org** व **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या** www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.या व्यतिरिक्त उमेदवार त्यांचा अर्ज ऑनलाईन भरण्याकरीता " **संग्राम केंद्र** " आणि " **महा-ई-सेवा केंद्र CSC** " यांचेशी संपर्क साधु शकतील. या शासनमान्य केंद्राची मदत घेतल्यास उमेदवारांना शासन निर्णय क्रमांक मातंस/२०१२/प्र.क्र.१५२/३९ दिनांक २३.५.२०१२ नुसार विहित केलेले शुल्क त्या कार्यालयांना अदा करावा लागेल.

२. उमेदवाराने उपरोक्त नमूद केलेल्या संस्थेच्या वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर (website) Apply online या लिंकवर क्लिक करावे व सर्व प्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटनवर (Button) क्लिक करावे.

३. नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application form number) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वतःकडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

४. त्यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (Print challan) या बटनवर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

५. बँक चलनावर नमूद केलेली फी स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखेमधे जाहिरातीत दिलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वतःकडे जपून ठेवावी. फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

६. बँकेत फी भरल्यानंतर उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज एक दिवसानंतर भरावा.

७. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो व स्वतःची स्वाक्षरी विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

८. उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेवून ती स्वतः जवळ ठेवावी.

९. वरील सर्व ( उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया, उर्वरीत अर्ज भरणे इ.) प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार लेखी परीक्षेस पात्र होईल.

१०. उमेदवारांच्या माहिती व मदतीकरीता मे.एम.के.सी.एल.पुणे यांच्या कॉल सेंटर वरील दूरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

१९) **महत्वाच्या सूचना** :-

१. पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. ऑनलाइन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये.

२. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

३. लेखी परीक्षेची तारीख वर्तमानपत्रातून जाहिरातीद्वारे व **महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास पत्राद्वारे पाठविण्यात येणार नसून परीक्षेचे प्रवेशपत्र व परिक्षास्थळाचा पत्ता हे ऑनलाईन **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org** या संकेतस्थळावर परिक्षेपूर्वी आठ दिवस आधी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशपत्राची Print स्वतः उमेदवारानी प्राप्त करुन घ्यावी. उमेदवारांनी त्यांचा अर्ज क्रमांक संकेतस्थळावर नमूद करुन लॉगऑन केल्यानंतर प्रवेशपत्राची सॉफ्टकॉपी संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

४. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक प्रमाणपत्रे , अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामधे संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. अंतिम निवडीपूर्व कागदपत्र तपासणीच्या वेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

५. लेखी परीक्षेतील गुणानुक्रमे व आरक्षण विचारात घेऊन पात्र झालेल्या उमेदवारांची नांवे **महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org या संकेतस्थळावर** जाहीर करण्यात येतील.

६. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे व शारिरीक पात्रता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शारिरीक पात्रता पुर्ततेच्या अधीन उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

७. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

८. अर्ज एकदा ऑनलाइन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशिल स्वतःजवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

९. **उमेदवाराने लेखी परीक्षेच्या वेळी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी फक्त काळया किंवा निळया शाईच्या बॉलपॉईन्टपेनचाच वापर करावा.**

## २०) उमेदवारांना इतर महत्वाच्या सूचना : ---

१) शासकीय,निमशासकीय,शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. रा.प.महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणूक झाल्यास त्याचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.

२) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित(एमकेसीएल) या** संस्थेच्या **http://msrtc.mkcl.org** या **संकेतस्थळावर** उपलब्ध होईल.

३) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

४) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

५) परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

६) विजा-अ,भज-ब,भज-क,भज-ड या प्रवर्गाकरीता विहीत केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे.

७) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जातीप्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

८) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र आवश्यक).

९) अ) इमाव,विमाप्र,विजा-अ,भज-ब,भज-क,भज-ड या मागासप्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट ) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

ब) इमाव,भज-क व भज-ड आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट ) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०) मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर,२०११ नुसार आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधीत उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथः सदर उमेदवाराची रा.प.महामंडळातील सेवा समाप्त करण्यात येईल.

**११**) लेखी परीक्षेतील गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्तीपूर्व कागदपत्र तपासणीवेळी शाळा सोडल्याचा दाखला,शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र गुणपत्रिका, शिकाऊ उमेदवारी, अवजड वाहन परवाना, प्रवासी वाहन बिल्ला, वाहक परवाना व बिल्ला, अनुभव,समांतर आरक्षणासंबंधी, डोमीसाईल, विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी **जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या मूळ व साक्षांकित प्रती (Attested copies) या केंद्र / राज्यशासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक यांच्याकडून साक्षांकित करुन अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.**

१२) एकाच वेळी एका पदासाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्याने उमेदवाराने एकापेक्षा अनेक विभागांकरीता अर्ज करु नयेत. उमेदवाराने त्यांना सर्वात सोयीच्या अशा एकाच विभागासाठी अर्ज करावा असे उमेदवारांना सूचीत करण्यात येत आहे.

१३) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे.निवड झालेल्या उमेदवारांना संबंधीत रा.प.विभागाच्या आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार नेमणूका देण्यात येतील.

१४) सदर जाहिरातीबाबत काही संभ्रम असल्यास रा.प.महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावरील जाहिरात ही अधिकृत समजण्यात येईल.

१५) **सदर भरती प्रक्रिया पूर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.**

**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**